॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

✲ सुविचार ✲

ज्याला मन जिंकता आले त्याने माणूस जिंकला,
आणि ज्याने मन जिंकले त्याने जग जिंकले.

अहिल्यानगर | रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ८० वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com

# गणेशोत्सवात 'डॉल्बी'चा दणदणाटावर बंदी

## गणेशोत्सव ते दसऱ्यापर्यंत अहिल्यानगर जिल्ह्यात बंदी | जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश, उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई

**● अहिल्यानगर | वीरभूमी–**
गणेशोत्सव, गणेश विसर्जन, नवरात्र व दसरा सणांच्या पार्श्वभूमीवर ध्वनीप्रदूषणाला आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी अहिल्यानगर शहर व ग्रामीण भागात डॉल्बी साऊंड सिस्टीम तसेच उच्च आवाजाच्या ध्वनीवर्धकांवर बंदी घातली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १६३(१) अंतर्गत हा आदेश निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी काढला आहे.

ही बंदी १४ सप्टेंबर २०२६ ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत लागू राहणार आहे. मिरवणुकांमध्ये डॉल्बी सिस्टीमचा वापर करणे, ती भाड्याने देणे किंवा उपलब्ध करून देणे यास मनाई करण्यात आली आहे.



ध्वनीप्रदूषणामुळे वृद्ध, रुग्ण, गर्भवती महिला, लहान मुले तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असून, सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्थेला बाधा निर्माण होऊ शकते, असे प्रशासनाने आदेशात नमूद केले आहे. मोठ्या आवाजामुळे निद्रानाश, तणाव, रक्तदाब वाढणे आणि हृदयविकाराच्या रुग्णांना त्रास होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनीही नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या ध्वनीप्रदूषण नियंत्रणासंदर्भातील आदेशांची अंमलबजावणी करताना दरवर्षी पोलीस प्रशासन आणि डॉल्बी चालक-मालक तसेच मंडळांचे कार्यकर्ते यांच्यात तणाव निर्माण होण्याची शक्यता असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून हा प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आला आहे. उत्सव काळात पारंपरिक वाद्ये, मर्यादित आवाजातील ध्वनीव्यवस्था आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना नियमांनुसार परवानगी राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय न्याय संहिता कलम २२३ तसेच इतर लागू कायद्यांनुसार कारवाई करण्यात येणार आहे. तातडीची परिस्थिती लक्षात घेऊन हा आदेश एकतर्फी (ए झरींश) पद्धतीने लागू करण्यात आला आहे. नियमभंग करणाऱ्या मंडळांवर, आयोजकांवर, ध्वनीव्यवस्था पुरवठादारांवर तसेच संबंधित मालकांवर गुन्हा दाखल करण्यासोबतच उपकरणे जप्त करण्याची कारवाईही होऊ शकते.

### आदेशातील प्रमुख बाबी

- डॉल्बी साऊंड सिस्टीम व उच्च आवाजाच्या ध्वनीवर्धकांचा वापर बंद.
- डॉल्बी सिस्टीम भाड्याने देणे किंवा उपलब्ध करून देण्यास मनाई.
- गणेशोत्सव, विसर्जन मिरवणुका, नवरात्र व दसरा कार्यक्रमांना आदेश लागू.
- शहरासह ग्रामीण भागातही प्रशासन व पोलिसांकडून अंमलबजावणी.
- नियमभंग करणाऱ्यांवर फौजदारी कारवाईची शक्यता.

### नागरिकांनी काय काळजी घ्यावी?

- गणेश मंडळांनी ध्वनीवर्धक वापरण्यापूर्वी संबंधित परवानग्या घेणे, निर्धारित ध्वनीमर्यादा पाळणे आणि रात्रीच्या वेळेतील निर्बंधांचे पालन करणे आवश्यक आहे. नागरिकांनी नियमभंग आढळल्यास स्थानिक पोलीस ठाणे किंवा प्रशासनाकडे तक्रार करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

## वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज | अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### दिलदार

विरोध सुद्धा माणसाला
करता यावा दिलदार
हसत खेळावे खुशाल
मत्सराचे खेळते वार

कायम मित्र कायम शत्रू
का असेल कुणी कुणाचा?
जशी नजर तसा गजर
प्रश्न प्रत्येकाच्या मनाचा

---

## SPOT NEWS

### मनमानी टॅरिफविरोधात ब्रिक्स देश एकवटले

**● नवी दिल्ली –** राजधानी दिल्लीतील भारत मंडपम येथे सुरू असलेल्या ब्रिक्स शिखर संमेलनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्रिक्सच्या भविष्याचा एक मसुदा मांडला. याला इतर देशांनी सहमती दर्शविली. ब्रिक्स देशांनी जागतिक स्तरावरील निर्णय प्रक्रियेत सर्वच देशांच्या समान वचनबद्धतेवर आणि सहभागावर भर दिला. यासोबतच अमेरिकेला थेट संदेश देत मनमानी टॅरिफबाबत चिंता व्यक्त करीत कोणताही देश दुसऱ्या देशावर एकतर्फी टॅरिफ लादू शकत नाही, असे म्हटले. हे आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विरुद्ध असून अन्न सुरक्षा, आरोग्य आणि मानवाधिकारासाठी हानिकारक असल्याचे म्हटले. ब्रिक्सने दहशतवादाच्या सर्व प्रकारांविरोधात ठाम भूमिका घेतली. ब्रिक्स शिखर परिषदेत आज दिल्ली घोषणा २०२६ ला एकमताने मंजुरी देण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतीन, चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग यांच्यासह सदस्य देशांसमोर घोषणेचा मसुदा सादर केला आणि यावर काही आक्षेप आहे का, असे विचारले. मात्र, कोणताही आक्षेप न घेता ही घोषणा एकमताने स्वीकारली. या घोषणेत ब्रिक्सची भविष्यातील दिशा आणि जागतिक व प्रादेशिक मुद्यांवर सदस्य देशांची सामायिक भूमिका स्पष्ट केली.

### बाजारात लिंबांचा तुटवडा; एक लिंबू दहा रुपयांना

**● पुणे –** वेळेपूर्वीच उन्हाळ्यात लिंबाची मोठ्या प्रमाणावर तोड करून शेतक-यांनी बाजारात लिंबं विक्रीस पाठविली. त्यामुळे ऐन पावसाळ्यात घाऊक बाजारात लिंबाचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा जाणवत आहे. पावसाळ्यात लिंबाचा दर कमी असतो. मात्र, तुटवडा जाणवत असल्याने लिंबाचा दर वाढला आहे. किरकोळ बाजारात एका लिंबासाठी १० रुपये मोजावे लागत असून, ४० ते ५० रुपयांत सहा लिंबांची विक्री केली जात आहे. 'पावसाळ्यात लिंबाला फारशी मागणी नसते, तसेच दरही कमी असतो. लिंबाला सर्वाधिक मागणी उन्हाळ्यात असते. उन्हाळ्यात घरगुती ग्राहक, सरबतविक्रेते, रसवंती गृहचालकांकडून मागणी वाढल्यानंतर बाजारात लिंबाचा तुटवडा जाणवतो.

---

# हायव्होल्टेज खांबावर तरुणाचा गोंधळ

## शेवगावातील घटनेमुळे वाहतूक कोंडी | जेसीबीच्या मदतीने तरुणाला सुरक्षित खाली उतरवले

**● शेवगाव | वीरभूमी–**
शेवगाव शहरातील इंदिरानगर परिसरात न्यायालयाच्या इमारतीसमोर शनिवारी (ता. १२) दुपारी एकच्या सुमारास एका तरुणाने रोहित्रासह हायव्होल्टेज वीजवाहक तारांच्या खांबावर चढून गोंधळ घातला. हा प्रकार सुमारे एक ते दीड तास सुरू राहिल्याने घटनास्थळी बघ्यांची मोठी गर्दी झाली. त्यामुळे वाहतूक कोंडी होण्याबरोबरच काही काळ वीजपुरवठाही खंडित झाला.



सुनील रामदास बर्डे (वय २५, रा. रांजणगाव मशीद, ता. पारनेर) हा तरुण मिरी रस्त्यावरील न्यायालय इमारतीसमोरील वीजखांबावर चढला होता. त्यावेळी काही कामानिमित्त वीजपुरवठा आधीच खंडित करण्यात आलेला होता. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

तरुण खांबावर गेल्याची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस प्रशासन आणि महावितरणचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तरुणाला सुरक्षित खाली उतरविण्यासाठी जेसीबीची मदत घेण्यात आली. पोलिसांनी आणि नागरिकांनी समजूत काढण्याचा प्रयत्न करत अखेर त्याला जेसीबीच्या साह्याने सुरक्षित खाली उतरविले.

या प्रकारामुळे न्यायालय परिसरात मोठी गर्दी झाल्याने काही काळ वाहतुकीची कोंडी झाली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागली.

तरुणाला सुरक्षित खाली उतरविण्यासाठी नगरसेवक संतोष जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद खांडबहाले, पोलीस कर्मचारी प्रशांत आंधळे, आदिनाथ शिरसाठ, राहुल आठरे, आदिनाथ खेडकर, वसंत वैद्य यांच्यासह स्थानिक नागरिकांनी प्रयत्न केले.

सुनिल बर्डे हा रांजणगाव मशीद, ता. पारनेर येथील रहिवासी आहे. कौटुंबिक कारणातून त्याने हा प्रकार केल्याची चर्चा घटनास्थळी होती. मात्र, पोलिसांकडून त्याची चौकशी करण्यात येत असून, तो शेवगावमध्ये नेमका कोणत्या कारणासाठी आला होता, याचाही तपास सुरू आहे. त्याची मानसिक स्थिती आणि घटनेमागील कारणांबाबतही पोलिसांकडून माहिती घेतली जात आहे. याप्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

---

# आरक्षणासाठी मराठा आंदोलकांची १५ सप्टेंबर रोजी मुंबईकडे कूच

**● जालना | वीरभूमी–**
मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी अंतरवाली सराटीतून मुंबईतील मराठा आंदोलनाची घोषणा केली. गणपती बसवायचा आणि निघायचे १५ सप्टेंबरला. अंतरवालीवरून सकाळी ११ वाजता मुंबईच्या दिशेने मराठ्यांचा महासागर निघेल. आजपासून तयारीला लागा. पहिला मुक्काम पाटोदा, १६ सप्टेंबर रोजी श्रीगोंदा, अहिल्यानगर, १७ सप्टेंबरला हडपसर, पुणे, १८ सप्टेंबरला खोपोली, १९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता आझाद मैदानावर आमरण उपोषण सुरू होईल, असे मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर केले.



मनोज जरांगे पाटील यांचा मराठा मोर्चा गणेश विसर्जनापूर्वी मुंबईत धडकणार आहे. त्यामुळे आता राज्य सरकार आणि पोलिस यंत्रणा, ही सगळी परिस्थिती कशी हाताळणार हे पाहावे लागेल. अंतरवाली सराटीतून ठिकठिकाणी मुक्काम करत मनोज जरांगे यांचा मराठा मोर्चा मुंबईत पोहोचणार आहे. प्रत्येक मुक्कामापूर्वी आपण दररोज १०० किलोमीटर अंतर पार करू, असे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले.

मुंबईतून आरक्षण घेऊन येईपर्यंत शांततेतच आंदोलन करायचे. दगडफेक कोणी करायची नाही, कोणी जाळपोळ करायची नाही. वाहने शांत चालवायची. या आचारसंहितेचे पालन सगळ्यांनी करायचे, अशी सूचना मनोज जरांगे यांनी मराठा आंदोलकांना केली. मुंबईत गेलेल्या सर्वांनी शांतता हा मार्ग स्वीकारायचा. आम्हाला लोकशाही मार्गाने आंदोलन करायचे आहे आणि आमचा हक्क मिळवायचा आहे, असे जरांगे यांनी म्हटले.

आपल्याला कोणी खुन्नस दिली म्हणून कोणी मोठा होत नाही. आपण त्याला खुन्नस दिली पाहिजे, असे नाही. समाज हा सगळ्यांचा बाप असतो. जो रुट असेल तो असेल. कुठूनही गेले तरी जायचेच मुंबईला. भावना समजून घ्या. जाताना थोडी वाट वाकडी करा, फक्त १०० ते १५० किलोमीटर जास्त पडेल. आपल्याला मुंबईला जाऊन जिंकून यायचे आहे. आपल्याला मुक्काम करत जावे लागते. आपला पहिला मुक्काम बीड जिल्ह्यात असेल. दुसरा मुक्काम श्रीगोंद्यात करावा लागेल. तिसरा मुक्का पुण्यातील हडपसर येथे करु. चौथा मुक्काम खोपोलीत असेल, कदाचित त्यानंतर कोपरखैरणेत मुक्काम करु आणि पाचवा मुक्काम मुंबईच्या आझाद मैदानात असेल, असे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले.

जरांगे पाटील यांनी मराठवाडा, विदर्भ-खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणातील मराठा बांधवांना कुटुंबीयांसह या मोर्चात सामील होण्याचे किंवा मार्गावर उपस्थित राहून आशीर्वाद देण्याचे आवाहन केले. तसेच प्रशासनाने आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केल्यास भाजपला त्याचे परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही त्यांनी दिला.

---



# खायला कहार अन् भुईला भार!

## पाथर्डीत वर्षानुवर्षे एकाच खुर्चीवर अधिकारी-कर्मचारी | 'स्थायी मुक्काम' कधी संपणार? जनतेचा सवाल-साहेब, पाथर्डी कधी बदलणार?

**● पाथर्डी | वीरभूमी–**
पाथर्डी तालुक्यातील शासकीय कार्यालयांचा कारभार पाहता सामान्य नागरिकांच्या मनात एक प्रश्न आता घर करू लागला आहे- सरकारी नोकरी आहे की एकाच ठिकाणी कायमस्वरूपी मुक्कामाची सोय?

तालुक्यातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये काही अधिकारी-कर्मचारी पाच-पाच, दहा-दहा वर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असल्याची चर्चा आहे. बदलीचे धोरण, प्रशासकीय फेरबदल आणि सेवा कालावधी याबाबत नियम असताना त्यांची अंमलबजावणी सर्वांसाठी समान होते का? काहींच्या बाबतीत मात्र नियमांना अपवादाची 'खिडकी' नेहमीच उघडी राहते का, असा सवाल उपस्थित होत आहे.

शासकीय सेवेत अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या नियमित बदल्या या प्रशासनातील पारदर्शकता आणि कार्यक्षमता टिकविण्यासाठी आवश्यक मानल्या जातात. मग पाथर्डी तालुक्यात काही कर्मचारी वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी का राहतात? त्यांच्या बदलीचे प्रस्ताव निघत नाहीत का? प्रस्ताव निघाला तर तो मध्येच थांबतो का? एकाच ठिकाणी दीर्घकाळ राहण्यामागे प्रशासकीय गरज आहे की अन्य कोणाचा वरदहस्त, हा प्रश्नही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

सामान्य नागरिक शासकीय कामासाठी कार्यालयात गेल्यानंतर त्याला वेळेत सेवा मिळते का, हा देखील महत्त्वाचा मुद्दा आहे. 'साहेब नाहीत', 'कर्मचारी नाहीत', 'फाईल सापडत नाही', 'उद्या या' किंवा नव्याने कागदपत्रांची मागणी अशा कारणांमुळे नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याच्या तक्रारी असतील, तर त्याची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे.

कार्यालयीन वेळेत अधिकारी-कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित आहेत की केवळ हजेरी रजिस्टरवर त्यांची उपस्थिती नोंदली जाते, याची अचानक तपासणी करण्याची गरज आहे. कार्यालयीन उपस्थिती, प्रलंबित प्रकरणे, नागरिकांच्या तक्रारी आणि कामकाजाची गती यांचा एकत्रित आढावा घेतल्यास प्रशासनातील कार्यतत्परतेचे वास्तव समोर येऊ शकते. बायोमेट्रिक हजेरी, कार्यालयीन उपस्थिती आणि नागरिकांच्या कामकाजाच्या नोंदी तपासल्यास अनेक प्रश्नांची उत्तरे मिळू शकतील.

शासकीय अधिकारी-कर्मचारी हे जनतेचे सेवक आहेत. मात्र काही ठिकाणी नागरिकांशी वागताना अधिकाराचा अतिरेक होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. 'माझी ओळख वरपर्यंत आहे', 'माझे कुणी काही करू शकत नाही', 'वरपर्यंत माझी पोहोच आहे', अशा स्वरूपाचा धाक दाखविला जात असल्याच्या तक्रारी असतील, तर प्रशासनाने त्याची निष्पक्ष चौकशी करणे आवश्यक आहे. सरकारी खुर्ची ही शासनाची की एखाद्या 'गॉडफादर'ची, असा प्रश्न त्यामुळे उपस्थित होतो.

वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कामकाजाचे स्वतंत्र मूल्यमापन झाले पाहिजे. त्यांच्या कार्यकाळात किती प्रकरणे निकाली काढली, किती प्रकरणे प्रलंबित आहेत, नागरिकांच्या किती तक्रारी प्राप्त झाल्या, त्यापैकी किती तक्रारींचे निराकरण झाले आणि कार्यालयीन उपस्थिती किती राहिली, याचा आढावा घेणे गरजेचे आहे.

तक्रारी असतील तर संबंधित सक्षम यंत्रणेने नियमानुसार चौकशी करावी. भ्रष्टाचाराचा आरोप म्हणजे दोष सिद्ध झाला असे नाही; मात्र आरोपांची निष्पक्ष चौकशी होणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

दीर्घकाळ एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची सेवा नोंद, बदलीचा इतिहास, कार्यक्षमता, तक्रारी आणि प्रशासकीय कामगिरी यांचे 'ऑडिट' करण्यात यावे. किती वर्षे एकाच ठिकाणी कार्यरत आहेत? का राहिले? बदली का झाली नाही? कोणत्या प्रशासकीय आदेशाने मुदत वाढविण्यात आली? या प्रश्नांची उत्तरे पारदर्शकपणे उपलब्ध झाली तर अनेक गैरसमज दूर होऊ शकतात.

पाथर्डी तालुक्यात दीर्घकाळ एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा विभागनिहाय आढावा घ्यावा, बदलीच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी, कार्यालयीन उपस्थितीची अचानक तपासणी करावी, प्रलंबित कामांचा अहवाल मागवावा आणि नागरिकांच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

अन्यथा प्रश्न पुन्हा तोच- खायला कहार अन् भुईला भार; जनतेला हेलपाटे अन् साहेबांना स्थायी मुक्काम!

पाथर्डी तालुक्यातील जनतेला आता एकच उत्तर हवे आहे- साहेब, पाथर्डी कधी बदलणार?

### पाथर्डीला 'ओळखी'चे नव्हे, 'कामगिरी'चे प्रशासन हवे!

- पाथर्डी तालुक्याचा विकास केवळ घोषणा, निधी आणि योजनांवर अवलंबून नाही. त्या योजना प्रत्यक्षात जनतेपर्यंत पोहोचविणारी प्रशासकीय यंत्रणा कार्यक्षम असणे तितकेच महत्त्वाचे आहे. शेतकरी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांना कार्यालयीन कामासाठी अनावश्यक हेलपाटे मारावे लागू नयेत, ही अपेक्षा अवाजवी नाही. जनतेला दहशतीचे प्रशासन नको; संवेदनशील प्रशासन हवे. उपकार नकोत; नियमाप्रमाणे वेळेत सेवा हवी. आश्वासने नकोत; काम हवे. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जनतेला 'गॉडफादर'च्या छायेतले अधिकारी नकोत; नियमांच्या चौकटीत काम करणारे प्रामाणिक, स्वाभिमानी आणि कार्यक्षम अधिकारी-कर्मचारी हवेत.

# SPOT NEWS

## कोतुळमध्ये मंगळवारी ऋषिपंचमीनिमित्त सामुदायिक अथर्वशीर्ष पठण

**● अकोले । वीरभूमी –**



तालुक्यातील कोतुळ येथील श्री वरदविनायक देवस्थानात ऋषिपंचमीनिमित्त मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजता सामुदायिक अथर्वशीर्ष पठणाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री गणेश उपासनेच्या माध्यमातून ऐक्य, बंधुभाव, सामाजिक एकोपा आणि राष्ट्रीय एकात्मतेला बळ मिळते. याच उद्देशाने श्री वरदविनायक देवस्थानाच्या वतीने वर्षभर विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. त्याच अनुषंगाने ऋषिपंचमीच्या पवित्र दिनाचे औचित्य साधून सामुदायिक अथर्वशीर्ष पठण आयोजित करण्यात आले आहे. कोतुळ परिसरात गेल्या काही वर्षांपासून या सामुदायिक पठणाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पहाटेच्या प्रसन्न वातावरणात शेकडो गणेशभक्तांच्या सामूहिक पठणाने मंदिर परिसर भक्तिमय होतो. विशेषतः महिला भाविकांचा या उपक्रमातील सहभाग लक्षणीय असतो. या निमित्ताने देवस्थानच्या वतीने भाविकांसाठी प्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. कोतुळ व परिसरातील गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामुदायिक अथर्वशीर्ष पठणात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रदीप भाटे, विनय समुद्र, कुलदीप नेवासकर, संभाजी पोखरकर, संतोष नेवासकर, विशाल बोऱ्हाडे, प्रणव परशुरामी, अनिल पाठक, सचिन पाटील, अजित आरोटे, सुभाष घाटकर, सागर सोनुले आणि वेदांग समुद्र आदींनी केले आहे.

## विकास आराखड्यातील दुबार आरक्षणावर हरकती नोंदवण्याचे आवाहन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगर महानगरपालिकेने नगर शहरासाठी तृतीय सुधारित विकास आराखड्याचा ठराव नुकताच सर्वसाधारण सभेत मंजूर केला आहे. या सुधारित आराखड्याचे अवलोकन करताना शहराच्या विकास नियोजनासाठी विविध १८ प्रकारची आरक्षणे प्रस्तावित करण्यात आल्याचे दिसून येते. यामध्ये बसस्थानक, दफनभूमी, सामुदायिक सभागृह, शैक्षणिक सुविधा, अग्निशमन केंद्र, उद्याने, आरोग्य सुविधा, ग्रंथालय, वाहनतळ, क्रीडांगण आदींचा समावेश आहे. या विविध आरक्षणांसाठी नगर शहरातील सुमारे ४७९ क्षेत्र आरक्षित करण्यात आल्याचे ॲड. अनिकेत अनिल कुलाळ यांनी सांगितले. सन २०३९ पर्यंत शहराचा नियोजित विकास व्हावा, हा विकास आराखड्याचा प्रमुख उद्देश असल्याचे सांगताना ॲड. कुलाळ यांनी आरक्षणांच्या नकाशांचा बारकाईने अभ्यास करण्याची गरज व्यक्त केली. जुन्या व नवीन आराखड्यांची तुलना केली असता काही ठिकाणी पूर्वी आरक्षित असलेले क्षेत्र कमी करण्यात आले असून, काही नवीन क्षेत्रांचा समावेश करण्यात आल्याचे दिसून येते. मात्र, काही ठिकाणी एकाच क्षेत्रावर दुबार आरक्षण करण्यात आल्याचे निदर्शनास येत असल्याचा दावा त्यांनी केला. पूर्वीच्या आराखड्यात आरक्षित असलेल्या काही क्षेत्रांचे आरक्षणाचे स्वरूप किंवा हेड बदलून त्याच ठिकाणी पुन्हा आरक्षण करण्यात आल्याचे आढळून येत असल्याचेही ॲड. कुलाळ यांनी नमूद केले. त्यामुळे संबंधित भूखंडधारकांनी नवीन व जुन्या आराखड्यांची तुलना करून आपल्या मालमत्तेवर आरक्षणाची पुनरावृत्ती झाली आहे का, याची खात्री करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी प्रारूप विकास आराखड्यात दर्शविण्यात आलेल्या नियोजित आरक्षणांबाबत नागरिकांना त्रुटी असल्यास हरकती नोंदविण्याचे आवाहन केले आहे.

## निमगाव वाघा येथे बैलपोळा उत्साहात साजरा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे श्रावणी बैलपोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शेतकऱ्यांचे कामधेनू असलेल्या बैलांना आकर्षक सजवून गावातून पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशे, लेझीम आणि साऊंड सिस्टमसह गुलाल व भंडाऱ्याच्या उधळणीने वातावरण रंगून गेले होते. बैलांना सजवून मिरवणुकीत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांचे बिरोबा मंदिर येथे स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था व श्री नवनाथ युवा मंडळाच्या वतीने डोंगरे संस्थेचे अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, अनिल डोंगरे, विजय जाधव, बाबुराव जाधव, सुभाष जाधव, अतुल फलके, गोकुळ जाधव, डॉ. विजय जाधव, अजय ठाणगे, सागर कापसे, एकनाथ जाधव, पिंटू जाधव, प्रशांत जाधव, बाबा जाधव, नामदेव जाधव, अजय जाधव, गुलाब जाधव आदी उपस्थित होते.

# सणासुदीपूर्वी पारनेर पोलिसांची 'फुलप्रूफ' तयारी!

**बसस्थानकावर ५० कर्मचारी, चार अधिकाऱ्यांचा संयुक्त मॉक ड्रिल । जमाव नियंत्रणासह आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचा सराव**

**● पारनेर । वीरभूमी –**

**गणेशोत्सव तसेच आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पारनेर पोलिसांनी कंबर कसली आहे. संभाव्य तणावपूर्ण परिस्थिती उद्भवल्यास ती तातडीने नियंत्रणात आणण्यासाठी जिल्हा पोलीस मुख्यालय, पारनेर पोलीस ठाणे आणि सुपा पोलीस ठाण्याच्या संयुक्त विद्यमाने पारनेर बसस्थानक परिसरात मॉक ड्रिल घेण्यात आली. या सरावातून पोलिसांनी सज्जता आणि तात्काळ कारवाईची क्षमता तपासून पाहिली.**



या मॉक ड्रिलमध्ये ५० पोलीस कर्मचारी आणि चार अधिकारी सहभागी झाले होते. जिल्हा पोलीस मुख्यालयातून आलेल्या अतिरिक्त कर्मचाऱ्यांसह विविध पथकांनी जमाव नियंत्रण, बॅरिकेडिंग, नागरिकांना सूचना देणे तसेच कायदा हातात घेणाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रत्यक्ष सराव केला. संभाव्य परिस्थितीत पोलिस दलातील विविध पथकांमध्ये समन्वय कसा साधायचा, याचीही चाचणी घेण्यात आली.

सरावादरम्यान जमावाला नियंत्रित करण्यासाठी घोषणांच्या माध्यमातून सूचना देण्याचा सराव करण्यात आला. पोलिसांच्या हातातील लाल बॅनरद्वारे शांतता राखण्याचे, कायदा व सुव्यवस्था बिघडवू नये तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले.

पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी म्हणाल्या, पोलिस प्रत्येक परिस्थिती हाताळण्यासाठी सज्ज आहेत. अहिल्यानगर पोलीस नागरिकांच्या सुरक्षेसाठी २४ तास तत्पर आहेत. कुठेही तणावाची परिस्थिती निर्माण झाल्यास ती तातडीने नियंत्रणात आणली जाईल.

आगामी सणांच्या काळात नागरिकांनी शांतता व संयम राखावा, पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी केले. या मॉक ड्रिलमुळे पोलिसांची तयारी, कार्यक्षमता आणि विविध पथकांमधील परस्पर समन्वयाची प्रभावी चाचणी झाल्याचे स्पष्ट झाले.

यावेळी सुपा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी, पारनेर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे, पोलीस उपनिरीक्षक रणजित मारक, पोलीस उपनिरीक्षक चांगदेव हंडाळ, पोलीस उपनिरीक्षक कडूस, महिला पोलीस उपनिरीक्षक शिवले, पोलीस मुख्यालयाचे कवायत निर्देशक तसेच पारनेर व सुपा पोलीस ठाण्यांचे २५ अंमलदार आणि २५ होमगार्ड उपस्थित होते.

## संजीवनी सैनिक स्कूलच्या ब्रास बँड पथकाला मानाचा बहुमान

**● कोपरगाव । वीरभूमी–**

माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत एकता नगर, गुजरात येथे ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी होणाऱ्या भव्य राष्ट्रीय एकता दिवस सोहळ्यातील 'एकता परेड-२०२६' मध्ये संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या मुलांच्या ब्रास बँड पथकाला 'स्कूल बँड डिस्प्ले' अंतर्गत सहभागी होण्याचा बहुमान प्राप्त झाला आहे. भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या राष्ट्रीय एकात्मता विभागाने अधिकृत पत्राद्वारे शालेय बँड पथकांमधून संजीवनी सैनिकी स्कूलच्या पथकाची केलेली ही निवड संस्थेच्या शिस्तबद्ध प्रशिक्षणाची, सांगीतिक गुणवत्तेची आणि विद्यार्थ्यांच्या राष्ट्रनिष्ठेची राष्ट्रीय पातळीवरील दखल आहे. या ऐतिहासिक सोहळ्यात विश्वस्त सुमित कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेचा आणि संजीवनीच्या गुणवत्तेचा गौरवपूर्ण निनाद घुमविणार असून, कोपरगावच्या ग्रामीण भूमीतून घडलेले हे विद्यार्थी थेट राष्ट्रीय मंचावर आपल्या कर्तृत्वाची अमिट छाप उमटविणार आहेत. या प्रतिष्ठेच्या संधीमुळे संजीवनी परिवारासह संपूर्ण महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष श्री नितीनदादा कोल्हे, संजीवनी विद्यापीठाचे प्रेसिडेंट तथा संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे, विश्वस्त सुमित कोल्हे यांनी सर्व सहभागी विद्यार्थी, प्राचार्य के. एल. दरेकर, संगीत शिक्षक महेश गुरव, नॉन अकॅडमिक डायरेक्टर डी. एन. सांगळे, कॅम्पस ॲडमिन विजय भास्कर, कल्चरल हेड शुभम जाधव यांचे अभिनंदन केले आहे. श्री. गुरव, भास्कर व श्री. जाधव विद्यार्थ्यांसमवेत जाणार आहे.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय एकता दिवस साजरा केला जातो. यावर्षी गुजरात राज्यातील एकता नगर (स्टॅच्यू ऑफ युनिटी परिसर) येथे होणाऱ्या राष्ट्रीय सोहळ्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहे. या भव्य कार्यक्रमात विविध राज्यांचे पोलीस दल, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल, राष्ट्रीय छात्र सेना, तसेच देशभरातील पुरस्कारप्राप्त शालेय मार्चिंग व बँड पथके सहभागी होणार आहेत.

२१ ऑक्टोबरपासून एकता नगर येथे सुरू होणाऱ्या संयुक्त सराव शिबिरात सहभागी होत हे पथक ३१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या राष्ट्रीय एकता परेडमध्ये आपली कला, शिस्त आणि देशभक्तीचे दर्शन घडविणार आहे. सीमा सुरक्षा बल यांच्या मार्गदर्शनाखाली देशभरातील निवडक बँड पथकांसोबत संयुक्त सरावही आयोजित करण्यात येणार आहे.

# वांजुळशेतमध्ये पारंपरिक वाद्यांच्या गजरात पोळा साजरा

**● अकोले । वीरभूमी –**



तालुक्यातील वांजुळशेत येथे पारंपरिक वाद्यांच्या गजरात बैलपोळा सण उत्साहात साजरा करण्यात आला. नवनवीन तंत्रज्ञानाच्या युगात विविध कार्यक्रमांमध्ये डीजेसह आधुनिक वाद्यांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. त्यासाठी मोठा खर्च होण्याबरोबरच ध्वनिप्रदूषणामुळे परिसरातील नागरिकांनाही त्रास सहन करावा लागतो. तसेच आधुनिक वाद्यांच्या वाढत्या वापरामुळे पारंपरिक वाद्ये लोप पावत आहेत.

या पार्श्वभूमीवर वांजुळशेत ग्रामस्थांनी आधुनिक वाद्यांना फाटा देत पारंपरिक वाद्यांच्या आवाजात पोळा सण साजरा केला. या उपक्रमामुळे पारंपरिक वाद्यांना तसेच स्थानिक कलाकारांनाही चालना मिळत आहे. संबळाच्या तालासुरात ग्रामस्थ उत्साहाने या उत्सवात सहभागी झाले होते.

तांबेकरवाडीतील ग्रामस्थांनी शांतामाई मंदिरापासून, तर कांदडवाडी व गावठा येथील ग्रामस्थांनी मारुती मंदिरापासून बैलांच्या मिरवणुकीला सुरुवात केली. त्यानंतर सर्व ग्रामस्थ मुक्ताई मंदिर व मोठादेव मंदिर परिसरात एकत्र आले. तेथे देवदर्शन घेतल्यानंतर शेतकरी आपापल्या बैलांना घेऊन घरी परतले.

पारंपरिक वाद्यांचा वापर, उत्साही वातावरण आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे वांजुळशेतमध्ये पोळा सणाला यंदा पारंपरिक संस्कृतीची आगळीवेगळी रंगत लाभली.

# श्रीगोंदा लोकन्यायालयात ८,२६५ प्रकरणे निकाली; ५ कोटी १८ लाखांची वसुली

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

राष्ट्रीय लोकअदालतीच्या माध्यमातून पक्षकारांनी जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढून वेळ, पैसा व श्रम वाचवावेत, असे आवाहन जिल्हा न्यायाधीश डी. पी. शिंगाडे यांनी केले. श्रीगोंदा येथील जिल्हा न्यायालयात शनिवारी दि. १२ रोजी आयोजित राष्ट्रीय लोकन्यायालयात ते बोलत होते. या लोकन्यायालयात दाखलपूर्व ८,२६५ व दाखल ७७, अशी एकूण ८,३४२ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून, एकूण ५ कोटी १८ लाख ९४ हजार १४९ रुपयांची वसुली झाली.

जिल्हा न्यायाधीश शिंगाडे म्हणाले की, मोटार अपघाताच्या प्रकरणांमध्ये न्याय मिळण्यासाठी चार ते पाच वर्षांचा कालावधी लागू शकतो. मात्र, लोकअदालतीमध्ये विमा कंपनीचे अधिकारी, पक्षकार आणि विधिज्ञ एकाच दिवशी उपलब्ध होत असल्याने योग्य संवादातून प्रकरणे जलदगतीने निकाली काढता येतात. अपघातानंतर रुग्णालयाचा खर्च व इतर गरजांसाठी नातेवाइकांना मोठ्या रकमेची आवश्यकता असते. लोकअदालतीत प्रकरण निकाली निघाल्याने ही रक्कम लवकर मिळण्यास मदत होते. त्यामुळे पक्षकारांना आर्थिक दिलासा मिळून मानसिक त्रासही कमी होतो. इतर प्रकरणांमध्येही पक्षकारांनी लोकअदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

वरिष्ठ न्यायालयाचे न्यायाधीश ए. एम. मुजावर यांनी सांगितले की, लोकन्यायालयात पक्षकारांच्या परस्पर तडजोडीने प्रकरणे निकाली निघत असल्याने वेळेची बचत होते. तसेच लोकअदालतीत तडजोडीने निकाली निघालेल्या प्रकरणांवर वरिष्ठ न्यायालयात अपील करता येत नसल्याने पक्षकारांचा वेळ, पैसा व श्रम वाचतात. दाखल तसेच दाखलपूर्व प्रकरणे लोकअदालतीत घेतली जात असल्याने सर्व पक्षकारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

श्रीगोंदा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. जयंत शिंदे यांनी लोकअदालतीचे महत्त्व व फायदे याबाबत पक्षकारांना मार्गदर्शन केले. जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

या लोकअदालतीत भूसंपादन, कौटुंबिक दावे, दिवाणी व फौजदारी प्रलंबित प्रकरणे, ग्रामपंचायत, नगरपालिका तसेच महावितरणची दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. या लोकन्यायालयात दाखलपूर्व ८,२६५ प्रकरणे निकाली काढण्यात आली. त्यातून १ कोटी ६४ लाख ३५ हजार ६८९ रुपयांची वसुली झाली. तसेच दाखल ७७ प्रकरणांतून ३ कोटी ५४ लाख



५९ हजार ४९० रुपयांची वसुली झाली. अशा प्रकारे एकूण ८,३४२ प्रकरणे निकाली काढून ५ कोटी १८ लाख ९४ हजार १४९ रुपयांची वसुली करण्यात आली.

यावेळी जिल्हा न्यायाधीश डी. पी. शिंगाडे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश एम. एम. राव, सहदिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर एस. पी. केकाण, द्वितीय सहदिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर ए. एम. मुजावर, सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पी. व्ही. पाटील, श्रीगोंदा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. जयंत शिंदे, श्रीगोंदा-कर्जत-जामखेड बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. एस. वाय. पत्की, विविध विधिज्ञ, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, बँक अधिकारी व कर्मचारी, नगरपरिषद व महावितरणचे अधिकारी-कर्मचारी तसेच न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.

# चापडगाव हायस्कूलमध्ये पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा

**मातीच्या गोळ्यांना मिळाला भक्ती आणि सृजनशीलतेचा सुंदर स्पर्श । विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**

**● शेवगाव । वीरभूमी –**

गणेशोत्सव हा आनंद, श्रद्धा आणि भक्तीचा उत्सव असला तरी तो पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करणे ही काळाची गरज आहे. याच सामाजिक व पर्यावरणीय जाणिवेतून चापडगाव हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याच्या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कल्पकतेला आणि कलागुणांना मातीच्या माध्यमातून सुंदर आकार दिला.

कार्यशाळेच्या प्रारंभी विद्यालयाचे कलाशिक्षक कल्याण राऊत व मार्गदर्शक पांडुरंग अर्जुन तेलोरे यांनी साधी माती, शाडू माती, पांढरी माती तसेच शेतातील माती यांचा वापर करून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कशा तयार कराव्यात, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. मार्गदर्शकांनी स्वतः गणेशमूर्ती तयार करून दाखवल्यानंतर विद्यार्थ्यांनीही आपल्या हातांनी आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या. मातीला आकार देताना विद्यार्थ्यांच्या



चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि उत्साह हा कार्यशाळेचा विशेष आकर्षणबिंदू ठरला.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य संपतराव दसपुते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, कोणताही उत्सव साजरा करताना पर्यावरणाचे संतुलन राखणे आवश्यक आहे. गणेशोत्सवाचे पावित्र्य टिकवून पर्यावरणाचे रक्षण करणे ही काळाची गरज आहे. निर्माल्य पाण्यात न टाकता झाडांजवळ अथवा शेतात खड्डा करून त्यामध्ये टाकल्यास त्यापासून सेंद्रिय खत तयार होऊ शकते आणि पर्यावरणाचेही रक्षण होते.

प्राचार्यांच्या या संदेशाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत यंदा आपल्या घरात पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचीच स्थापना करू, असा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपप्राचार्य सुनील जायभाये व पर्यवेक्षक संजय दुधाडे यांचे विशेष सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या गणेशमूर्तींचे प्राचार्य दसपुते, उपप्राचार्य जायभाये व पर्यवेक्षक दुधाडे यांनी कौतुक करून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे अभिनंदन केले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रभाकर मराठे यांनी केले. परीक्षक म्हणून लोहकरे, सुपारे, नितीन फोपसे, सर्जेराव निकाळजे, आत्माराम झरेकर, सुभाष बर्डे, रणदिवे डी. एम., दत्तात्रय रणदिवे, श्रीमती बोडखे, श्रीमती गायके व श्रीमती धट यांनी काम पाहिले.

अक्षय पुरनाळे, विष्णू दळे, नवनाथ लोंढे यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे कौतुक केले. तसेच सुभाष मोहिते मामा, चंदू म्हस्के मामा, त्रिंबके मामा यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

विद्यार्थ्यांनी आपल्या हातांनी घडवलेल्या या पर्यावरणपूरक गणेशमूर्तींमधून 'भक्तीला पर्यावरण संवर्धनाची जोड' देण्याचा सुंदर संदेश समाजापर्यंत पोहोचला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्याबरोबरच त्यांच्यामध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी रुजण्यास मदत होत आहे.

## मारुतराव घुले पाटील जयंतीनिमित्त ऊस उत्पादकांचा मंगळवारी गौरव

**श्री ज्ञानेश्वर ऊस उत्पादकता पुरस्काराने होणार सन्मान**

**● नेवासा । वीरभूमी–**

तालुक्यातील भेंडा येथील ज्ञानेश्वर उद्योग समूहाचे संस्थापक लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या ९६ व्या जयंतीनिमित्त ऊस उत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा 'श्री ज्ञानेश्वर ऊस उत्पादकता पुरस्कार' देऊन गौरव करण्यात येणार आहे. मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी हा शेतकरी गौरव सोहळा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक अनिल शेवाळे यांनी दिली.



नेवासा तालुक्यातील भेंडा येथील श्रीसंत नागेबाबा भक्तनिवास येथे सकाळी १० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. श्रीसद्गुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत गुरुवर्य उद्धव महाराज मंडलिक (नेवासेकर) यांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण करण्यात येणार असून, लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष तथा माजी आमदार नरेंद्र घुले पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत.

यावेळी जिल्हा सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष तथा माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, नेवासा येथील श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष तथा माजी आमदार पांडुरंग अभंग, ॲड. देसाई देशमुख आणि कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमास कारखान्याचे सभासद, ऊस उत्पादक शेतकरी तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# SPOT NEWS

## साकरवाडी येथे १६ ते २३ सप्टेंबरदरम्यान श्रीमद् भागवत कथेचे आयोजन

**● कोपरगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील साकरवाडी येथील गोदावरी बायो रिफायनरी लि. गणेशोत्सव मंडळाच्या वतीने महंत रामगिरीजी महाराज, मठाधिपती श्रीक्षेत्र गोदाधाम यांच्या सुश्राव्य वाणीतून श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १६ ते २२ सप्टेंबर या कालावधीत सायंकाळी ७ ते ९ वा.भागवत कथा होणार असून परिसरातील भाविकांसाठी हा आध्यात्मिक पर्वणीचा सोहळा ठरणार आहे. या भागवत कथेद्वारे भगवान श्रीकृष्णाच्या भक्तीबरोबरच जीवनमूल्ये, संस्कार आणि अध्यात्माचा संदेश भाविकांना मिळणार आहे. महंत रामगिरी महाराज यांच्या रसाळ वाणीतील निरूपणाचा लाभ घेण्यासाठी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, दि. २३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत काल्याचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. कीर्तनानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. या धार्मिक सोहळ्यात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन ज्ञानामृताचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक समितीच्या वतीने संचालक सुहास गोडगे यांनी केले आहे.



## ओबीसींची स्वतंत्र जातनिहाय जनगणना करावी; स्वतंत्र रकाना उपलब्ध करून द्या !

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

देशात सुरू असलेल्या जनगणना प्रक्रियेत ओबीसी समाजाची जातनिहाय स्वतंत्र नोंद करण्यासाठी जनगणना पत्रिकेत स्वतंत्र रकाना उपलब्ध करून द्यावा, तसेच ओबीसी समाजाच्या लोकसंख्येची अचूक नोंद करावी,महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत दयावी या प्रमुख मागणीसाठी काँग्रेसच्या ओबीसी विभागाच्या शिष्टमंडळाने मुंबई राजभवन येथे महाराष्ट्राचे राज्यपाल विष्णूजी देव वर्मा यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. काँग्रेसचे माजी विधानसभा अध्यक्ष आमदार नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले, यावेळी काँग्रेसच्य राष्ट्रीय समन्वयक मंगलताई भुजबळ, राष्ट्रीय ओबीसी उपाध्यक्ष भानुदास माळी,विमल कटरे, ऍड शुभांगी शेरेकर, धनराज राठोड, अनंत मोहोळ, जीवन चाकणकर, श्रावणकुमार रेपणवार, अशोक खलाने, शंभू म्हात्रे, जितेश विशे, विनोद अहिरकर, राजीव गुट्टे, विजय राऊत, शैलेश राऊत, विजय घुटे यांच्यासहीत ३२ ओबीसी पदाधिकारी उपस्थित होते. जनगणना प्रक्रियेत ओबीसी समाजासाठी स्वतंत्र रकाना नसल्याबाबत शिष्टमंडळाने तीव्र चिंता व्यक्त केली. अनुसूचित जाती-जमातीप्रमाणे ओबीसी समाजाचीही स्वतंत्रपणे जातनिहाय गणना करणे आवश्यक असून, ओबीसी समाजाच्या हक्कांवर कोणताही अन्याय होऊ नये, अशी ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली. ओबीसी समाजासोबत मोठा अन्याय होत असून, त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. गावागावांत ओबीसी समाजामध्ये या प्रश्नाबाबत जागृती निर्माण झाली आहे. शासनाने वेळीच दखल घेतली नाही, तर व्यापक जनआक्रोश निर्माण होऊन आंदोलनाची तीव्रता वाढू शकते, असा इशारा शिष्टमंडळाच्या वतीने देण्यात आला. केंद्र सरकारने ओबीसी समाजाच्या जातनिहाय जनगणनेबाबत दिलेला शब्द पाळावा. केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना जाहीर केली असली, तरी जनगणनेच्या प्रक्रियेत ओबीसी समाजाची जातनिहाय स्वतंत्र आणि अचूक नोंद होणे आवश्यक आहे.

## महामार्गावर स्पीड ब्रेकर बसवा, अन्यथा तीव्र आंदोलन!

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील मुकुंदनगर परिसरात वाहनांचा वेग वाढल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून, अपघातांना आळा घालण्यासाठी तातडीने स्पीड ब्रेकर बसवावेत, अशी मागणी माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक यांनी केली आहे. याबाबत त्यांनी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले असून, मागणीची तातडीने दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर नव्याने महानगरपालिका कार्यालयासह मुकुंदनगर परिसरात ये-जा करण्यासाठी असलेल्या प्रमुख तीन रस्त्यांवर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. महामार्गावरून वाहने अतिशय वेगाने धावत असल्याने रस्ता ओलांडताना नागरिकांना मोठ्या जीवितधोक्याचा सामना करावा लागत आहे. मुकुंदनगर हा मोठ्या लोकवस्तीचा परिसर असून, येथे २४ तास नागरिकांची ये-जा सुरू असते. विशेषतः लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांना महामार्ग ओलांडताना मोठा धोका निर्माण झाला आहे.

# डिंभा बोगद्याला स्थगिती नाही : डॉ. सुजय विखे

**पारनेरचा ५० वर्षांचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी सोडविणार । १६ किमी बोगद्याचे काम लवकरच सुरू होणार**

**● निघोज । वीरभूमी –**

डिंभा बोगद्याच्या कामाला कोणत्याही प्रकारची स्थगिती आलेली नसून, हे काम पूर्ण होणारच आहे. पारनेर तालुक्यातील जनतेचा गेल्या ५० वर्षांपासूनचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी प्रयत्न सुरू असून, डिंभा बोगद्याच्या माध्यमातून पारनेरसह जिल्ह्याच्या दक्षिण भागाचा पाण्याचा प्रश्न सुटणार असल्याची ग्वाही माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.

संदीप पाटील वराळ जनसेवा फाउंडेशन व निघोज ग्रामस्थांच्या वतीने आयोजित दहीहंडी उत्सव शुक्रवारी (दि. ११) उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला निघोज व पंचक्रोशीतील पाच हजारांहून अधिक नागरिक उपस्थित होते. सायंकाळी शबनम पुणेकर यांचा नृत्य-संगीताचा कार्यक्रम झाला. रात्री साडेआठच्या सुमारास डॉ. सुजय विखे पाटील यांचे निघोज येथे आगमन झाले. त्यांनी प्रथम मळगंगा देवीचे दर्शन घेतले. त्यानंतर कार्यकर्त्यांनी त्यांना मिरवणुकीने कार्यक्रमस्थळी आणले.

यावेळी आमदार काशिनाथ दाते, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, जिल्हा उपाध्यक्ष रखमाजी कापसे, संदीप पाटील वराळ जनसेवा फाउंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, भाजप नेते राहुल शिंदे, भाजप युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष पंकज कारखिले, माजी पंचायत समिती सदस्य दिनेश बाबर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भास्करराव उचाळे, उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ माऊली वरखडे, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष बबनराव तनपुरे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दहीहंडी उत्सवासाठी ५ लाख ५५ हजार रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले होते. रात्री ११ वाजता ओतूर येथील रामराज्य गोविंदा पथकाने दहीहंडी फोडल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी बोलताना डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले, पारनेर हा पूर्वीपासून दुष्काळी तालुका आहे. मात्र, पुढील ५० वर्षांचे पाण्याचे नियोजन करून तालुक्याचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी डिंभा बोगद्याचे काम पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन पाठपुरावा केला आहे. त्यामुळे हे काम पूर्ण होणार आहे. स्थगिती आल्याच्या केवळ वावड्या असून, त्यावर कोणीही विश्वास ठेवू नये.

माजी खासदार बाळासाहेब विखे पाटील यांनी हयातभर पाण्यासाठी संघर्ष केला. जिल्ह्यातील अनेक तालुक्यांत कायमस्वरूपी पाणी योजना राबवून पारनेर तालुका दुष्काळमुक्त करण्याचे त्यांचे स्वप्न होते. राधाकृष्ण विखे पाटील यांनी डिंभा बोगद्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. सर्व नेतेमंडळींच्या पाठबळामुळे १६ किलोमीटर लांबीच्या या बोगद्याचे काम लवकरच सुरू होणार असून, पारनेरसह जिल्ह्याच्या दक्षिण भागाचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे. आम्हाला आमचे समान पाणी द्या, हीच आमची मागणी असून ती या बोगद्याच्या माध्यमातून पूर्ण होणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

आमदार काशिनाथ दाते हे कार्यक्षम नेतृत्व असून, गेल्या दोन वर्षांत तालुक्यात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत. विकासकामांच्या माध्यमातून आम्ही जनतेत असून, जनता हेच आमचे दैवत आहे, असे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

आमदार काशिनाथ दाते यांनी संदीप पाटील वराळ जनसेवा फाउंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक केले. दहीहंडी उत्सवाच्या माध्यमातून निघोज येथे मोठी गर्दी झाली असून, निघोज-अळकुटी जिल्हा परिषद गटातील युवा नेतृत्व म्हणून सचिन पाटील वराळ यांना मोठी संधी आहे. तालुक्यातील विकासकामांसाठी राधाकृष्ण विखे पाटील व डॉ. सुजय विखे पाटील यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.

सचिन पाटील वराळ यांनी प्रास्ताविकात डॉ. सुजय विखे पाटील यांचे निघोजवर विशेष प्रेम असल्याचे सांगितले. हातावर शस्त्रक्रिया झालेली असतानाही ते कार्यक्रमाला उपस्थित राहिले. डिंभा बोगद्याचे काम होणार असून, पारनेर तालुक्याला दुष्काळमुक्त करण्याचे आश्वासन त्यांनी दिल्याचे वराळ यांनी सांगितले. राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून तालुक्यात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली असल्याचेही त्यांनी नमूद केले. सूत्रसंचालन उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे यांनी केले. युवा नेते अर्जुन लामखडे यांनी आभार मानले.

## डिंभे-माणिकडोह बोगद्याला विरोध करणाऱ्या वळसे पाटलांच्या भूमिकेचा घनश्याम शेलार यांच्याकडून निषेध

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा दिला राजीनामा**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

कुकडी प्रकल्पातील डिंभे-माणिकडोह बोगद्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री व माजी विधानसभा अध्यक्ष आमदार दिलीपराव वळसे पाटील यांनी केलेल्या विरोधाचा निषेध नोंदवत अजित पवार गटाचे श्रीगोंद्याचे जागरूक नेते घनश्याम शेलार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे.

याबाबत त्यांनी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांना १२ सप्टेंबर २०२६ रोजी पत्र पाठवून राजीनामा स्वीकारण्याची विनंती केली आहे.

पक्षाच्या स्थापनेपासून स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटनेच्या विविध जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे व परिश्रमपूर्वक पार पाडल्या. तसेच सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालीही पक्ष संघटना बळकट करण्याची इच्छा होती. मात्र, कुकडी प्रकल्पातील डिंभे-माणिकडोह बोगद्याबाबत आमदार दिलीपराव वळसे पाटील यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे आपण राजीनामा देत असल्याचे घनश्याम शेलार यांनी पत्रात नमूद केले आहे.

कुकडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्यावरील पारनेर, श्रीगोंदा, कर्जत व करमाळा तालुक्यांतील शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पाणी मिळत नसल्याचा मुद्दा उपस्थित करून शेलार यांनी या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली आहे. प्रकल्प अहवालानुसार डिंभे व माणिकडोह धरणांतून डाव्या कालव्यासाठी आवश्यक असलेले पाणी आजतागायत मिळाले नसल्याने या भागातील शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



या प्रश्नावर गेल्या अनेक वर्षांपासून विविध नेते व कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले. स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्यासाठी आपणही प्रयत्न केले. तत्कालीन जलसंपदा मंत्री जयंतराव पाटील यांच्याकडे आग्रह धरून शरद पवार यांच्या उपस्थितीत बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. या दोन्ही बैठकांना आमदार दिलीपराव वळसे पाटील उपस्थित होते. कुकडी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना हक्काचे पाणी मिळावे, यासाठी डिंभे-माणिकडोह बोगद्याला मान्यता देण्याबाबत चर्चा झाल्याचे पत्रात नमूद आहे.

दरम्यान, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मंत्रिमंडळ बैठकीत प्रस्ताव मांडून या बोगद्याला नुकतीच मंत्रिमंडळाची मान्यता मिळवून दिली आहे. मात्र, आमदार वळसे पाटील यांनी या प्रकल्पाला विरोध करून आमदारकीच्या राजीनाम्याची धमकी दिल्याचा आरोप घनश्याम शेलार यांनी केला आहे. ही भूमिका चुकीची, दुर्दैवी व कुकडी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांवर अन्याय करणारी असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

वळसे पाटील यांनी मुख्यमंत्री महोदयांना दिलेले पत्र आणि त्याची प्रत तसेच त्याआधारे सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेले पत्र यामुळे बोगद्याच्या निर्णयाला स्थगिती मिळाल्यास पारनेर, श्रीगोंदा, कर्जत व करमाळा तालुक्यांतील शेतकऱ्यांवर घोर अन्याय होईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे. या भूमिकेमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मोठी राजकीय किंमत मोजावी लागू शकते, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

आमदार दिलीपराव वळसे पाटील यांची भूमिका पक्षाच्या दृष्टीने हानिकारक असल्याचा आरोप करत, या भूमिकेचा निषेध म्हणून आपण राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत असल्याचे घनश्याम शेलार यांनी स्पष्ट केले आहे. आपला राजीनामा मंजूर करावा, अशी विनंती त्यांनी राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्याकडे केली आहे.

## बैलपोळ्यानिमित्त उद्योजक गणेश सोनटक्के यांच्याकडून मानाचा फेटा व शाल देऊन गौरव शेतकऱ्यांचा सन्मान

**● पाथर्डी । वीरभूमी–**

मातीशी नाळ जोडून ऊन, वारा आणि पावसाची तमा न बाळगता वर्षभर शेतात राबणाऱ्या बळीराजाच्या कष्टाला सलाम करण्याची गरज आहे. शेतकऱ्याच्या संसाराचा अविभाज्य भाग असलेल्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा बैलपोळा हा केवळ सण नसून, शेतकरी आणि त्याच्या मुक्या सोबत्यातील जिव्हाळ्याचे नाते अधोरेखित करणारा दिवस आहे. या भावनेला सामाजिक संवेदनशीलतेची जोड देत बैलांची मिरवणूक काढणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्यांचा सन्मान करण्याचा गणेश तात्या सोनटक्के यांचा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले.

बैलपोळ्याचे औचित्य साधून अर्जुना युवा प्रतिष्ठान, गणेश तात्या सोनटक्के मित्र मंडळ आणि अमोल सोनटक्के मित्र मंडळाच्या वतीने पाथर्डी शहरात बैलांची पारंपरिक वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. दक्षिणमुखी विजय हनुमान मंदिराला प्रदक्षिणा घालत निघालेल्या या मिरवणुकीत सहभागी कष्टकरी शेतकऱ्यांचा मानाचा फेटा व शाल देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष अभय आव्हाड बोलत होते.

याप्रसंगी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे, माजी नगराध्यक्ष नंदकुमार शेळके, नगरसेवक अमोल गर्जे, गणेश तात्या सोनटक्के, अमोल सोनटक्के यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, शेतकरी व नागरिक उपस्थित होते.



सजवलेल्या बैलांची मिरवणूक, ढोल-ताशांचा गजर आणि उत्साहपूर्ण वातावरणामुळे पाथर्डी शहरात पारंपरिक कृषी संस्कृतीचे दर्शन घडले. मात्र, या उत्सवाचे खरे केंद्र वर्षभर शेतीच्या मातीत घाम गाळणारे शेतकरी ठरले. त्यांच्या कष्टांची दखल घेत करण्यात आलेला सन्मान हा त्यांच्या श्रमाला समाजाने दिलेली आदराची पावती ठरला.

गणेश तात्या सोनटक्के मित्र मंडळाच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाचे मोल समाजासमोर अधोरेखित व्हावे आणि नव्या पिढीला कृषी संस्कृतीची जाणीव व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

बैलपोळा हा शेतकऱ्यांच्या भावविश्वाशी जोडलेला सण आहे. वर्षभर शेतात राबणाऱ्या मुक्या जीवांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच त्यांची काळजी घेणाऱ्या बळीराजाप्रती आदर व्यक्त करण्याचा हा दिवस आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाला सन्मान मिळावा, हीच या उपक्रमामागची भावना आहे, असे अर्जुना युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश तात्या सोनटक्के यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या सन्मानासोबतच त्यांच्या सुख-दुःखाशी जोडलेली संवेदनशीलताही यावेळी दिसून आली. पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त करत नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी वरुणराजाला साकडे घातले.

आज बळीराजा मोठ्या संकटातून जात आहे. पावसाची प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांच्या डोळ्यांत चिंता आहे. ही परिस्थिती लवकर बदलू दे, आभाळ भरून येऊ दे आणि समाधानकारक पाऊस पडून शेतकऱ्यांच्या शिवारात पुन्हा हिरवाई नांदू दे. बळीराजाच्या चेहऱ्यावर पुन्हा आनंदाचे हास्य फुलू दे, अशी प्रार्थना आव्हाड यांनी केली.

# चिमुकल्या विद्यार्थ्यांनी घेतली पत्रकाराची धडाकेबाज मुलाखत!

**'बातमी कशी तयार होते?' पासून पत्रकारितेतील आव्हानांपर्यंत प्रश्नांची सरबत्ती । वीरभूमीचे प्रतिनिधी अनिल खाटेर यांनी दिली दिलखुलास उत्तरे**

**● पाथर्डी । वीरभूमी –**

विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला वाव देत त्यांच्यात आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि सामाजिक भान निर्माण करण्याच्या उद्देशाने पी. एम. श्री. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाथर्डी येथे अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी थेट पत्रकाराची प्रकट मुलाखत घेत 'बालपत्रकार' म्हणून आपल्या कौशल्याची झलक दाखवून उपस्थितांची मने जिंकली.

हातात माईक घेत विद्यार्थ्यांनी अत्यंत आत्मविश्वासाने पत्रकारितेविषयी विविध प्रश्न विचारत संवाद साधला. बातमी कशी तयार होते?, पत्रकाराला बातमी मिळाल्यानंतर पुढे काय प्रक्रिया होते?, पत्रकारितेच्या क्षेत्रात कोणती आव्हाने असतात? आणि समाजामध्ये वृत्तपत्रांचे महत्त्व काय आहे? यांसह पत्रकारितेच्या विविध पैलूंवर विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने प्रश्नांची सरबत्ती केली.

या प्रश्नांना दैनिक वीरभूमीचे तालुका प्रतिनिधी अनिल खाटेर यांनी अत्यंत सोप्या आणि सहज भाषेत दिलखुलास उत्तरे दिली. बातमी लिहिताना



सत्यता, अचूकता, निष्पक्षता आणि समाजहित यांना असलेले महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. पत्रकार हा केवळ बातमी देणारा नसून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे आणि जनतेपर्यंत वस्तुस्थिती पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम करतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

वाचनाची सवय ही उत्तम पत्रकार आणि सुजाण नागरिक घडविण्याची पहिली पायरी आहे, असे सांगत खाटेर यांनी विद्यार्थ्यांना दररोज वर्तमानपत्र वाचण्याचा, आजूबाजूच्या घडामोडी जाणून घेण्याचा आणि प्रत्येक विषयाकडे प्रश्नार्थक नजरेने पाहण्याचा सल्ला दिला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पत्रकारितेची ओळख होण्याबरोबरच मुलाखत घेण्याचे कौशल्य, प्रभावी संवाद, प्रश्न विचारण्याचे धाडस आणि सामाजिक विषयांकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्याची संधी मिळाली. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेला हा उपक्रम शिक्षणाच्या चौकटीबाहेर जाऊन प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याचे उत्तम उदाहरण ठरला.

चिमुकल्या बालपत्रकारांचे आत्मविश्वासपूर्ण प्रश्न आणि पत्रकार अनिल खाटेर यांचे दिलखुलास मार्गदर्शन यामुळे हा उपक्रम ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरला. अशा उपक्रमांमधून भविष्यातील धीट, निःपक्ष, सुजाण आणि जबाबदार नागरिक घडण्यास निश्चितच हातभार लागेल.

या आगळ्यावेगळ्या उपक्रमासाठी मुख्याध्यापिका नंदा तुपे तसेच शिक्षिका छाया चंदनशिव, सुरेखा बडे, भावना देवरे, मंदा पालवे, ज्योती जाधव, मनिषा फटांगरे, कविता शिरसाट आणि ज्योती भोसले यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कांदा महागला, भजी बदलली!

**पारनेरमध्ये कांदा भजीऐवजी कोबी भजीला पसंती**



**● पारनेर । वीरभूमी –**

कांद्याच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने त्याचा परिणाम आता सर्वसामान्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयींवरही दिसून येत आहे. चहाच्या टपऱ्यांपासून हॉटेलपर्यंत लोकप्रिय असलेल्या कांदा भजीची जागा आता कोबी भजीने घेतल्याचे चित्र पारनेर शहर व परिसरात पाहायला मिळत आहे.

कांद्याचे वाढलेले दर लक्षात घेता हॉटेल व्यावसायिकांनी खर्च कमी करण्यासाठी कोबीचा पर्याय स्वीकारला आहे. पावसाळा आणि थंडीच्या दिवसांत गरमागरम कांदा भजीला मोठी मागणी असते. चहासोबत कांदा भजी खाण्यास नागरिकांची विशेष पसंती असते. मात्र, कांद्याचे दर वाढल्याने भजी बनविण्याचा खर्चही वाढला आहे. त्यामुळे अनेक छोट्या हॉटेल व्यावसायिकांनी कांदा भजीच्या तुलनेत स्वस्त असलेल्या कोबीचा वापर सुरू केला आहे.

कोबी, बेसन, हिरवी मिरची, कोथिंबीर व मसाल्यांचा वापर करून तयार करण्यात येणारी कोबी भजी ग्राहकांनाही पसंत पडत असल्याचे व्यावसायिक सांगत आहेत.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# पाथर्डी आगारातील ३३ बसेस कोकणात; प्रवाशांचे हाल!

## गणेशोत्सवासाठी बसेस पाठवल्याने स्थानिक वाहतूक व्यवस्था कोलमडली । विद्यार्थी, महिला व ग्रामीण प्रवाशांची गैरसोय

**● पाथर्डी । वीरभूमी–**

**कोकणवासीयांचा गणेशोत्सवाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी राज्याच्या विविध भागांतून एसटी बसेस कोकणात पाठविण्यात आल्याने स्थानिक वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. पाथर्डी आगारातील तब्बल ३३ बसेस गेल्या दोन दिवसांपासून कोकण विभागात पाठविण्यात आल्याने पाथर्डी तालुक्यातील प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत. बससेवा विस्कळीत झाल्याचा फायदा घेत काही खासगी व अवैध प्रवासी वाहतूकदारांकडून प्रवाशांची अडवणूक व आर्थिक लूट होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यातच शाळकरी विद्यार्थ्यांच्या प्रवासाचा प्रश्नही गंभीर बनला आहे.**



पाथर्डी आगारात एकूण ५७ बसेस आहेत. त्यातील अनेक जुन्या बसेस पुणे, नाशिक यांसारख्या मार्गांवर धावतात. मुळात प्रमुख मार्गांवर प्रवाशांच्या मागणीनुसार बससेवा उपलब्ध करून देण्यासाठी आणखी किमान दहा बसेसची तातडीने गरज असताना ऐन सणासुदीच्या काळात ३३ बसेस कोकणात पाठविण्यात आल्याने स्थानिक वाहतूक नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे.

दरवर्षी गणेशोत्सवाच्या काळात आठवडाभर कोकणातील वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणावर एसटी बसेस वळविल्या जातात. मात्र, कोकणात गणेशभक्त मोठ्या संख्येने असले तरी उर्वरित महाराष्ट्रातही गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्यामुळे एका विभागाची गरज भागविताना इतर भागातील प्रवाशांची गैरसोय होणार नाही, याचे नियोजन महामंडळाने करणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

गौरी-गणपतीसाठी गावागावांतून प्रवाशांची लगबग वाढली आहे. मात्र, ग्रामीण भागातील बससेवेचे नियोजन कोलमडल्याने प्रवाशांना तासन्तास बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. काही मार्गांवर खासगी व अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्यांकडून प्रवाशांची आर्थिक लूट सुरू असल्याचा आरोप आहे.

विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचविण्यासाठी पालकांना ट्रॅक्टर, टेम्पो आदी पर्यायी वाहनांचा आधार घ्यावा लागत असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. नगर-पाथर्डी-नगर मार्गावरील गेल्या काही दिवसांपासून सुरळीत सुरू असलेली बससेवाही विस्कळीत झाली आहे.

पुणे व मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांचेही मोठे हाल होत असून, खासगी ट्रॅव्हल्सच्या अनेक वाहतूकदारांनी भाडेवाढ केल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. आगाराची वाहतूक व्यवस्था पूर्ववत होण्यासाठी आणखी किमान चार दिवस लागण्याची शक्यता असल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

एसटी बसेसची संख्या कमी झाल्याने बसस्थानकांवर गर्दी वाढली आहे. या परिस्थितीचा फायदा घेत काही खासगी वाहतूकदारांचे एजंट बसस्थानक परिसरात गाड्या लावून प्रवासी वाहतूक करीत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे प्रवाशांची अडवणूक आणि आर्थिक लूट रोखण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

गणेशोत्सव काळात प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी महामंडळाने गरजेनुसार खासगी बसेस कराराने उपलब्ध करून घ्याव्यात आणि प्रवाशांची वाहतूक सुरळीत ठेवावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

याबाबत प्रवासी संघटनेचे संतोष जिरेसाळ म्हणाले, राज्य परिवहन महामंडळाला केवळ कोकणातील गणेशभक्तांचीच सेवा करायची असेल, तर उर्वरित महाराष्ट्रातील भाविकांसाठी स्वतंत्र पर्यायी व्यवस्था करावी. प्रवाशांना सेवा देण्याची जबाबदारी महामंडळाची असून, प्रवाशांची अडवणूक होत असेल तर त्याविरोधात न्यायालयीन दाद मागण्याशिवाय पर्याय राहणार नाही.

दोन्ही बसस्थानकांवर तासन्तास महिला, मुली आणि गावाकडे जाणारे प्रवासी बसची वाट पाहत असतात. गर्दीच्या परिस्थितीत छेडछाडीचे प्रकार रोखणे कर्मचाऱ्यांसाठीही आव्हानात्मक ठरते. गर्दीचा फायदा घेत दागिने चोरी व खिसेकापूच्या घटना घडत असल्याच्या तक्रारीही आहेत. काही गुंडांकडून कर्मचाऱ्यांनाही धमकावले जात असल्याचे जिरेसाळ यांनी सांगितले.

लहान मुलांना गर्दीचा मोठा त्रास सहन करावा लागत असून, या परिस्थितीची शासनाने गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे. वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी बहुतांश वेळा खासगी वाहनांचा वापर करीत असल्याने सर्वसामान्य प्रवाशांच्या अडचणींची तीव्रता त्यांच्या लक्षात येत नसल्याची टीकाही जिरेसाळ यांनी केली.

गणेशोत्सवाच्या काळात पाथर्डी तालुक्यातील प्रवाशांची गैरसोय तातडीने दूर करून पर्यायी बसेस उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी संतोष जिरेसाळ यांनी केली आहे.

# वसुंधरा अकॅडमीत विद्यार्थ्यांनी साकारले इको-फ्रेंडली गणपती

## शाडू मातीपासून आकर्षक मूर्ती । पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विद्यार्थ्यांची सृजनशीलता

**● अकोले । वीरभूमी–**

अभिनव शिक्षण संस्था, अकोले संचालित वसुंधरा अकॅडमीमध्ये विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणपतींची सुंदर निर्मिती करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘इको-फ्रेंडली गणपती’ स्पर्धेत इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत शाडू मातीपासून आकर्षक गणपती मूर्ती साकारल्या.



वसुंधरा अकॅडमीच्या कलाशिक्षिका काजल डावखर यांनी विद्यार्थ्यांना इको-फ्रेंडली गणपती बनविण्याचे प्रशिक्षण दिले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जाणीव निर्माण करणे हा होता.

प्लास्टर ऑफ पॅरिस व रासायनिक रंगांमुळे जलप्रदूषण होते. त्यामुळे नैसर्गिक व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले. प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गणपती मूर्ती केवळ कलात्मक नव्हत्या, तर प्रत्येक मूर्तीमागे सामाजिक किंवा पर्यावरणीय संदेशही होता. काही विद्यार्थ्यांनी जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले, तर काहींनी ‘झाडे लावा, पर्यावरण वाचवा’ हा संदेश दिला.

संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव नवले, सचिव विक्रम नवले, कोषाध्यक्ष डॉ. जयश्री देशमुख, सहसचिव व प्राचार्य अल्फोन्सा डी., सर्व पदाधिकारी, विविध विभागांचे प्राचार्य तसेच पालकांनी शाळेच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्याबरोबरच त्यांच्यात सृजनशीलता, सामाजिक जाणीव आणि पर्यावरणाप्रती जबाबदारीची भावना विकसित होण्यास मदत झाली.

# गणेशोत्सव भक्ती व शक्तीचे प्रतीक : अभय आव्हाड

## श्री विवेकानंद विद्यालयातील ४१० विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती

**● पाथर्डी । वीरभूमी–**

गणेशोत्सव हा भक्ती आणि उत्साहाचा सण असला तरी त्याला पर्यावरण संवर्धनाची जोड देणे ही काळाची गरज आहे. या उद्देशाने पार्थ विद्या प्रसारक मंडळ संचलित श्री विवेकानंद विद्यामंदिर, पाथर्डी येथे पर्यावरणपूरक गणपती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यालयातील ४१० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत मातीपासून गणरायाच्या विविध रूपांच्या आकर्षक मूर्ती साकारत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.




समाजामध्ये जनजागृती आणि एकता निर्माण करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. हा उत्सव भक्ती व शक्तीचे प्रतीक आहे, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष व पार्थ नगरीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले.

गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती तसेच रासायनिक रंगांचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याने विसर्जनानंतर जलस्रोतांचे प्रदूषण होऊन जलचरांवर विपरीत परिणाम होतो. ही बाब लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना शाडूची माती आणि नैसर्गिक साधनांचा वापर करून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने आणि कल्पकतेचा वापर करत विविध आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या. कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्साह व आनंद ओसंडून वाहत होता.

या कार्यशाळेसाठी उत्कृष्ट शिल्पकार प्रा. प्रल्हाद चितळे, आजिनाथ दराडे आणि दीपक राठोड यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष व नगराध्यक्ष अभय आव्हाड, मुख्याध्यापक शरद मेढे, विश्वस्त कुणाल आव्हाड, ज्ञानेश्वर गायके, अनुजा कुलकर्णी, संपत घारे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यशाळेचे प्रास्ताविक मुख्याध्यापक शरद मेढे यांनी केले. सूत्रसंचालन ज्ञानेश्वर गायके यांनी केले, तर दीपक राठोड यांनी आभार मानले.

# वीज चोरीला आळा घाला; अधिकृत वीज वापरा

## संध्याकाळच्या वाढीव मागणीच्या काळात वीज वापराबाबत दक्षता घ्या : उपकार्यकारी अभियंता श्रीकांत सोनवणे

**● अकोले । वीरभूमी–**

वीज ही दैनंदिन जीवनातील अत्यावश्यक गरज असून, तिचा प्रामाणिक व कायदेशीर वापर करणे ही प्रत्येक ग्राहकाची सामाजिक जबाबदारी आहे. वीज चोरी, अनधिकृत जोडणी, मीटरमध्ये फेरफार, मीटर बायपास करून वीज वापरणे अथवा अन्य कोणत्याही अनधिकृत पद्धतीने वीज वापरणे हा कायद्याने दंडनीय गुन्हा आहे. त्यामुळे ग्राहकांनी वीज चोरीपासून दूर राहून अधिकृत वीज जोडणीचा वापर करावा आणि वीज बिलांचा नियमित भरणा करावा, असे आवाहन महावितरण अकोले उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता श्रीकांत सोनवणे यांनी केले.

सध्या वीज मागणी आणि उपलब्ध वीजपुरवठ्यात तफावत निर्माण होत असल्याने विशेषतः संध्याकाळच्या वाढीव मागणीच्या काळात भार नियमनाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. या पार्श्वभूमीवर ग्राहकांनी वीज वापराचे योग्य नियोजन करावे. घरगुती तसेच व्यावसायिक ग्राहकांनी संध्याकाळच्या वेळेत एकाच वेळी मोठ्या क्षमतेची उपकरणे सुरू न करता त्यांचा वापर शक्यतो पुढील वेळेत करावा, असे महावितरणने म्हटले आहे.

संध्याकाळच्या वीज मागणीच्या काळात पाणी गरम करण्यासाठीचे हीटर, गिझर, इस्त्री, एअर कंडिशनर, मोठ्या क्षमतेच्या मोटारी तसेच अन्य उच्च वीज वापरणारी उपकरणे टाळावीत. या काळात विजेचा वापर प्रामुख्याने आवश्यक प्रकाश व्यवस्था व अत्यावश्यक उपकरणांसाठी करावा. ग्राहकांच्या सहकार्यामुळे वीज वितरण व्यवस्थेवरील ताण कमी होण्यास मदत होईल.

वीज चोरी व अनधिकृत वीज वापरामुळे वितरण व्यवस्थेवर अतिरिक्त भार पडतो. त्याचा परिणाम वीज वितरणाच्या गुणवत्तेवर होण्याबरोबरच प्रामाणिकपणे वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांवरही अप्रत्यक्षपणे होतो. त्यामुळे वीज चोरीमुक्त आणि सुरक्षित वीज व्यवस्था निर्माण करण्यासाठी नागरिकांनी महावितरणला सहकार्य करावे, असे सोनवणे यांनी सांगितले.

वीज बचतीसाठी ग्राहकांनी पर्यायी ऊर्जास्रोतांचा अधिकाधिक वापर करावा. पाणी गरम करण्यासाठी पारंपरिक वीज हीटरऐवजी सोलर वॉटर हीटरचा वापर करावा. शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध सौर कृषी योजनांचा लाभ घेऊन सौरऊर्जेवर आधारित कृषीपंपांचा वापर वाढवावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

घरगुती वापरात अनावश्यक दिवे, पंखे व विद्युत उपकरणे सुरू ठेवू नयेत. ऊर्जा कार्यक्षम उपकरणांचा वापर करून विजेची बचत करावी. विशेषतः संध्याकाळच्या वाढीव मागणीच्या कालावधीत विजेचा काटकसरीने वापर करणे ही प्रत्येक ग्राहकाची जबाबदारी आहे.

वीज चोरी किंवा अनधिकृत वीज जोडणी आढळल्यास संबंधित ग्राहकावर नियमानुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल. वीज चोरीच्या प्रकरणात कोणताही राजकीय दबाव, मध्यस्थी किंवा प्रलोभन मान्य केले जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही महावितरणने दिला आहे.

नागरिकांनी परिसरात संशयास्पद अनधिकृत वीज जोडणी, मीटरमध्ये फेरफार किंवा वीज चोरीचा प्रकार आढळल्यास त्याची माहिती महावितरणच्या संबंधित कार्यालयाला द्यावी. नागरिकांच्या सहकार्यामुळे वीज चोरीला आळा घालण्यास आणि वितरण व्यवस्था अधिक सक्षम करण्यास मदत होईल.

आपली वीज-आपली जबाबदारी! वीज चोरीला नकार-राष्ट्रहिताला होकार! वीज वाचवा, भार कमी करा आणि सुरक्षित वीज व्यवस्थेसाठी महावितरणला सहकार्य करा, असे आवाहन उपकार्यकारी अभियंता श्रीकांत सोनवणे यांनी केले आहे.

# कान्हेगाव शिवारातील पिके पाण्याअभावी धोक्यात

## पडेगाव सिंचन शाखेच्या दुर्लक्षामुळे शेतकरी संकटात । पाणी सोडण्याची शेतकऱ्यांची मागणी

**● कोपरगाव । वीरभूमी –**

कान्हेगाव शिवारातील शेती पाण्याअभावी संकटात सापडली असून, उभी पिके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ सुरू झाली आहे. सिंचनासाठी पाण्याची गरज असताना पडेगाव सिंचन शाखेकडून अपेक्षित नियोजन व देखरेख होत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.



कान्हेगाव परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी पिकांसाठी सिंचनाच्या पाण्यावर मोठा खर्च केला आहे. मात्र, वेळेवर पाणी उपलब्ध होत नसल्याने पिकांची वाढ खुंटण्याची तसेच उत्पादनावर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे. पिके ऐन वाढीच्या अवस्थेत असताना पाण्याची कमतरता निर्माण झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

सिंचन व्यवस्थेचे योग्य नियोजन करून उपलब्ध पाण्याचे समतोल वाटप करणे अपेक्षित असताना संबंधित शाखेकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. कालव्यांची पाहणी, पाणीवाटपाचे नियोजन आणि प्रत्यक्ष शेतापर्यंत पाणी पोहोचते की नाही, याची नियमित तपासणी होणे आवश्यक आहे.

शेतीसाठी वेळेवर पाणी मिळाले नाही तर केलेला संपूर्ण खर्च वाया जाण्याची शक्यता आहे. संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून पाण्याचे नियोजन करावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

दरम्यान, पडेगाव सिंचन शाखेने कान्हेगाव शिवारातील परिस्थितीची तातडीने पाहणी करून आवश्यकतेनुसार पाणी सोडावे आणि सिंचन व्यवस्थेतील अडचणी दूर कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. पाणी मिळण्यास आणखी विलंब झाल्यास शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

# पारनेरमध्ये शिवसेना ठाकरे गटाची नवी ‘टीम’

## जुन्या-नव्या शिवसैनिकांना संधी । तालुका, गट व गणनिहाय पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

**● पारनेर । वीरभूमी –**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या मान्यतेने पारनेर तालुक्यातील विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. अनुभवी पदाधिकाऱ्यांसह नव्या शिवसैनिकांनाही संघटनेत जबाबदारी देण्यात आली असून, आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या नियुक्त्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

पक्षाचे संपर्कप्रमुख आमदार सुनील शिंदे व जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी यांनी स्थानिक पदाधिकारी व शिवसैनिकांशी चर्चा करून संघटनात्मक गरजांचा आढावा घेतला. त्यानंतर पदाधिकाऱ्यांची यादी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आली. मान्यता मिळाल्यानंतर नियुक्त्या जाहीर करून संबंधितांना नियुक्तीपत्रे देण्यात आली.

या नियुक्त्यांमुळे पारनेर तालुक्यात तालुका पातळीपासून गट व गण पातळीपर्यंत पक्ष संघटनेची नव्याने बांधणी करण्यात आली आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बूथ, गण व गट पातळीवर संघटन अधिक प्रभावी करण्यावर पक्षाने भर दिला आहे.

### तालुका व विधानसभा पातळीवरील नियुक्त्या

डॉ. भास्कर शिरोळे – उपजिल्हाप्रमुख, कैलास बन्सी डोमे – विधानसभा संघटक, डॉ. श्रीकांत तान्हाजी पठारे – तालुकाप्रमुख, संतोष येवले – पारनेर-नगर विधानसभा प्रमुख, लहू बबन मुळे – विधानसभा समन्वयक, अविनाश मते – उपजिल्हा समन्वयक, अतुल बबन मुळे – उपजिल्हा संघटक, शुभम दिलीप पाडळे – तालुका प्रसिद्धी प्रमुख, सुनिता मुळे – महिला आघाडी उपजिल्हा संघटक, मनिषा रामदास ठाणगे – उपतालुका महिला संघटक, संभाजी थोरे – ढवळपुरी गट उपतालुका प्रमुख आणि गोरक्षनाथ दुधाडे – ढवळपुरी युवा सेना विभाग अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### उपतालुका व तालुका पातळीवरही नियुक्त्या

बाबासाहेब भाऊ रेपाळे, संदीप नामदेव मोढवे, नितीन तुकाराम आहेर, संतोष भाउसाहेब साबळे आणि अंबर बबन पवार यांची उपतालुकाप्रमुख म्हणून नियुक्ती झाली आहे. मंगेश सदाशिव सालके यांची तालुका समन्वयक, तर किरण सदाशिव सुपेकर व विश्वनाथ गंगाराम डोके यांची तालुका सहसंघटक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सुभाष सुरेश होले व सुहास सुरेश होले यांच्यावर तालुका सहसमन्वयकपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

### चार गटांसाठी विभागप्रमुख

रामदास दत्तात्रय खोसे – जवळा गट विभागप्रमुख, रतन परंडवाल – निघोज गट विभागप्रमुख, मुकेश गवळी – सुपा गट विभागप्रमुख आणि आयुब शेख – ढवळपुरी गट विभागप्रमुख म्हणून नियुक्त झाले आहेत. अनिकेत देशमाने – टाकळीढोकेश्वर गट उपविभागप्रमुख, सतीश रघुनाथ रासकर – जवळा गट उपविभागप्रमुख, बाळासाहेब धोंडीबा खोसे – निघोज गट उपविभागप्रमुख, सोमनाथ मधुकर पवार – सुपा गट उपविभागप्रमुख, ज्ञानेश्वर तुकाराम खाडे – ढवळपुरी गट उपविभागप्रमुख आणि बाबासाहेब वामन नऱ्हे – टाकळीढोकेश्वर गट उपविभागप्रमुख म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.

### आठ गणांसाठी गणप्रमुख

जवळा गण – शरद धोंडीबा कोठावळे, कान्हूरपठार गण – भाउसाहेब बबन गाडगे, अळकुटी गण – सुभाष भोसले, निघोज गण – शिवाजी गंगाराम लाळगे, वाडेगव्हाण गण – उद्धव सुभाष शेळके, सुपा गण – गोरख श्रीपती दिवटे, टाकळीढोकेश्वर गण – गणेश बबन आहेर आणि भाळवणी गण – संदीप बाळकृष्ण रोहोकले यांची गणप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.